दै. सकाळ दि. 25/03/2022

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव

संस्थेच्या परिसरातील अंडरग्राउंड व ओव्हरहेड टाक्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरणासाठी निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर माहिती www.gcoej.ac.in वर प्रकाशित केली आहे.

प्राचार्य

Scanned By Scanner Go

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, JALGAON
(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
National High 6, Jalgaon-425002, India. | राष्ट्रीय महामार्ग ६, जळगाव-४२५००२, भारत.
Phone: (0257) 2281522,2280531,2280534 | फोन (०२५७) २२८१५२२,२२८०५३०,२२८०५३४
Email: principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in Website: www.gcoej.ac.in

जा. क्र.:शाअमज/661 /२०२२/ दिनांक : 23 MAR 2022

**संस्था परिसरातील सर्व पाण्याच्या टाक्या (ओव्हरहेड/अंडरग्राऊंड) स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव येथील इमारतीच्या वर (ओव्हरहेड ) पाण्याची टाक्या व भूमिगत पाणी साठवण टाक्या स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करण्याबाबत निविदा.

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यलाय जळगाव कडून तांत्रिक निविदा(Technical bid) व वित्तीय निविदा तथा आर्थिक बोली (Finacial bid) बंद पाकिटात प्रपत्र-२ मध्ये दर्शविलेल्या टाक्याच्या स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण कामासाठी मागवण्यात येत आहे.

निविदा सूचना

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव यांच्याद्वारे महाविद्यालयातील "ओव्हरहेड पाण्याची टाक्या व भूमिगत पाण्याच्या साठवण टाक्या सफाई व निर्जंतुकीकरण कामे करण्याकरिता दोन भागांमध्ये सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. कंत्राटदाराला सदरील कामाचे कमीतकमी एक वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे. पात्र एजन्सी/कंत्राटदार यांनी त्याच्या bid (बोलीसोबत) त्या संबंधित पुरावाखातर दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे. तसेच कंत्राटदार यांनी स्वत:चा पॅन व आधारकार्ड स्वयं साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे. पात्र कंत्राटदार यांनी पहिल्या सीलबंद पाकिटात पूर्वीचा कामाचा अनुभव, कामाकरिता वापरण्यात येणारी टेकनॉलॉजि, कंत्राटदार याची माहिती बाबतचे कागदपत्रे इत्यादी बाबीचा समावेश असणे अपेक्षित आहे व पाकिट सीलबंद करून त्यावर तांत्रिक निविदा-भाग १ (Technical bid-part -१) असे लिहावे. तसेच दुसऱ्या सीलबंद पाकिटात काम करण्यासाठी वापरण्यात येणारी सामुग्री, कामाचा कालावधी व आकारण्यात येणारे दर याबाबत माहिती दयावी व पाकीट सीलबंद करून त्यावर आर्थिक बोली (Finacial bid ) असे लिहावे. सदरील दोनीही सीलबंद पाकीट स्वतंत्र अशा वेगळ्या पाकिटात एकत्रित सीलबंद करून त्यावर कंत्राट दाराचे नाव, निविदेचा विषय, निविदा जमा केलेल्या दिवसाची दिनांक लिहिणे अपेक्षित आहे. सर्व कंत्राटदारांनी लक्षात ठेवावे कि अंतिम दिनांक 04/04/2022 पर्यंत (सायं. 5 वाजेपर्यंत) निविदा महाविद्यालयाच्या कार्यालयात स्वीकारल्या जातील. पोस्टाद्वारे अथवा इतर कारणाने उशिरा मिळालेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

उशिराने प्राप्त झालेल्या निविदेवर कसल्याच सबबीचा विचार कारण्यात येणार नाही व अश्या उशिराने प्राप्त झालेल्या निविदा रद्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव यांना कोणत्या क्षणी पूर्ण/काही निविदा स्वीकारायच्या किंवा रद्द करण्याचा सर्वस्व अधिकार असेल त्यामुळे रद्द झालेल्या निविदांवर कसल्याच प्रकारचे आक्षेप कंत्राटदारांना करता येणार नाही. तसेच कंत्राट कालावधीमध्ये कंत्राटदाराकडून योग्य ती कामाची गुणवत्ता दिली जात नसेल किंवा खालावली असेल तर त्याच क्षणी कामाचे कंत्राट रद्द करण्यात येईल व या विषयी कोणताच पत्र व्यवहार स्वीकारल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

GOVT. COLLEGE OF ENGINEERING ★ JALGAON ★ सत्यमेव जयते

Scanned By Scanner Go

अटी व शर्ती:

१. या संस्थेत असलेल्या ओव्हरहेड व अंडरग्राउंड पाण्याच्या टाक्या स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यासाठी ११ महिन्यातसाठी कंत्राट द्यायचे आहे. प्रत्येक टाकीची स्वच्छता व निर्जंतुकीकरण शंभर दिवसात एकदा याप्रमाणे ११ महिन्यात तीन वेळेस करायचे आहे.

२. निविदाकार महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभाग किंवा राज्य/केंद्र शासनाच्या सेवा पुरवठादाराच्या नोंदणीसाठी प्राधिकृत संस्थेकडे नोंदणीकृत असला पाहिजे.

३. निविदाकार याना किमान एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. शैक्षणिक संस्थेत अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. संबंधित कामाचा अनुभव असलेले स्व-प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक राहील (कोरोना काळापूर्वी संबंधित काम केले असल्यास तसे स्व-प्रमाणित पत्र जोडावे. शैक्षणिक संस्थेत काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे)

४. संस्थेकडून स्वच्छता व निर्जंतुकीकरण यासाठी कोणतेही साहित्य उपलब्ध करण्यात येणार नाही. परंतु संस्थेत उपलब्ध असलेले पाण्याचे पंप व त्यासाठी लागणारी विद्युत संस्थेकडून उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी निविदाकार यांना एकूण निविदा किंमतीच्या एक टक्का रक्कम (नापरतावा रक्कम) संस्थेस द्यावी लागेल.

५. स्वच्छता व निर्जंतुकीकरण करतेवेळी पाण्याचे पंप हे खराब झाल्यास त्याची जबाबदारी निविदाकार यांची राहील. पाण्याचा पंप खराब झाल्यास किंवा जळाल्यास तो दुरुस्त करून देणे निविदाकार यांना बंधनकारक आहे. त्यासाठी रुपये १००००/- (दहा हजार) अनामत म्हणून बिनव्याजी रक्कम या कार्यालयात जमा करावी लागेल. सदरची रक्कम ही कंत्राट संपल्यानंतर व अर्ज केल्यानंतर पंधरा दिवसात परतावा करण्यात येईल.

६. तांत्रिक निविदा व वित्तीय निविदा तथा आर्थिक बोली यांचे स्वतंत्र दोन लिफाफे करून सीलबंद करावे. दोन्ही निविदा एका वेगळ्या लिफाफ्यात बंद करून सील करावेत.

७. सीलबंद तांत्रिक निवेदेच्या लिफ़ाफ़्यावर "अ. क्र. १ तांत्रिक निविदा" व सीलबंद वित्तीय निविदा तथा आर्थिक बोली च्या लिफ़ाफ़्यावर "अ. क्र. २ वित्तीय निविदा" असे सुस्पष्टपणे लिहिणे आवश्यक राहील.

८. दोन्ही लिफाफे तिसऱ्या लिफाफ्यामध्ये टाकून लिफाफा सीलबंद करावा व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव -४२५००२ यांच्याकडे अंतिम दिनांकापूर्वी, अंतिम दिनांकास कार्यालयीन वेळेत पोहचेल यांची खात्री करावी. अंतिम दिनांकानंतर आलेली कोणतेही निविदा स्वीकारण्यात येणार नाही यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**पहिला भाग- तांत्रिक निविदा (Technical Bid )**

"अ. क्र. १ तांत्रिक निविदा" मध्ये निविदाकाराने खालील कागदपत्रे अनुक्रमे जोडावीत

अ) सेवा पुरवठादार संस्थेच्या लेटरहेडवर अथवा शिक्का असलेल्या कागदावर निविदाकाराची सही व शिक्का असलेले स्वतःची किंवा संस्थेची माहिती असलेले विवरणपत्र पत्र (प्रपत्र-१)

ब) संबंधित सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य/केंद्र शासनाच्या आवश्यक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत तसेच ईत्तर संबंधित प्रमाणपत्र (उदा. फर्म , उद्योग इत्यादी )

क) सेवा पुरवठादार/सेवा पुरविणाऱ्या संस्थेच्या संचालकांची नावे, कार्यालयीन पत्ते व संपर्क क्रमांक यांचे विवरणपत्र

ड) निविदा सुचना मध्ये नमूद केलेल्या अनुभव प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे

इ) संस्थेचे जीएसटी(GST) रजिस्टेशन प्रमाणपत्र

फ) कामगारांकरिता सुरक्षा बूट व ड्रेस कोड पुरवण्याबाबत चे हमीपत्र

ग) सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र

ह) या आधीच्या/सध्याच्या विविध प्रतिष्ठानास देत असलेल्या सेवा समाधानकारक असल्याबाबत प्रमाणपत्र

ज) कामगारांचा अपघात विमा (उपलब्ध असल्यास प्राधान्य देण्यात येईल, तसेच कंत्राट मिळाल्यानंतर ज्यांचा विमा आहे असेच कामगार या संस्थेत काम करतील. किमान अपघात विमा ५०००००/- पाच लाख असणे आवश्यक)

ल) कामगारांचे वर्तणूक प्रमाणपत्र (कंत्राट मिळाल्यावर काम करणारे) व कामगारांचे निर्व्यसनी असल्याचे प्रमाणपत्र, (उपलब्ध असल्यास सोबत जोडावे, नसल्यास कंत्राट मिळाल्यानंतर १५ दिवसात देणे बंधनकारक राहील)

म). पॅन कार्ड/ आधार कार्ड व इतर दस्तऐवज स्वयं साक्षांकित प्रत (लागू असलेली सर्व ईत्तर दस्तावेज).

न) कंत्राटदारांनी तांत्रिक बोलीसोबत वरील कागदपत्रे (स्वयं-साक्षांकित) जोडावीत. संस्थेने दिलेल्या सर्व शर्ती व अटी बिनशर्त मान्य असे समजण्यात येईल.

प) सेवेचा दर्जा इतर बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास 15 दिवसाची पूर्वसूचना देण्यात येऊन कंत्राट रद्द करण्यात येईल. कंत्राट बाबत/ सेवा देण्याबाबत असाधारण त्रुटी असल्यास कंत्राट सूचना न देता ताबडतोब रद्द करण्यात येईल व त्याचे अधिकार माननीय प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव यांना असतील.

र) प्रत्येक कागदपत्रावर पान क्रमांक नमूद करण्यात यावा तसेच एकूण पाने खालील प्रमाणे स्वतंत्र कागदावर प्रमाणित करावे

“प्रमाणित करण्यात येते की मी/आम्ही सादर करीत असलेल्या निविदायादी सोबत एकूण पाने____________ तांत्रिक छाननी करता जोडण्यात येत आहे”

निविदा धारकाची सही व शिक्का

<u>सर्वसामान्य नियम व अटी:</u>

1) जे कंत्राटदार निवडल्या जातील त्यांनी वर्क ऑर्डर मिळण्यापूर्वी सर्व मूळ प्रमाणपत्रे व संबंधित दस्तावेज कार्यालयाकडून पडताळून घेणे बंधनकारक आहे.
2) कामामध्ये विलंब झाल्यास महाविद्यालय नियमानुसार दंड आकारू शकते.
3) कामासाठी लागणारे सर्व साहित्य व मटेरियल याची व्यवस्था करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार नाही. कंत्राटदाराने टाकी सफाई साठी लागणारी सर्व साहित्य व मटेरियल याचे खर्च स्वतः करावे
4) कामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या साठवणुकीसाठी कंत्राटदाराने स्वतःची व्यवस्था करावी त्याकरिता संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे स्टोरेज भेटणार नाही
5) कामाकरता लागणारे इलेक्ट्रिक बिल व पाणीवापराकरिता एकुण बिलाच्या १% रकम आकारण्यात येईल.

6) ओव्हरहेड पाण्याची टाकी व भूमिगत पाण्याची साठवण टाकीचे सफाई व निर्जंतुकीकरण करण्याकरिता खालील प्रमाणे काम होणे अपेक्षित आहे.

a. Dewatering

b. Sludge Removing Treatment

c. Algaecide Treatment:

d.High Pressure Treatment:

e.Improver Treatment:

f. Chlorination Treatment (High Dose):

g. Pipelines Treatment

7) टाकी सफाईचे काम वरील प्रमाणे दर ९० दिवसांनी करणे बंधनकारक राहील.

8) एक टाकी सफाईचे काम शक्यतोवर एकदिवसात पूर्ण होईल असे नियोजन करून पाण्याची व्यवस्था लवकरात लवकर सुरळीत होईल याकडे प्राधान्य द्यावे.

9) संस्थेच्या कोणत्याही भागातील टाकी साफ-सफाई करण्याच्या एक दिवस पहिले संबंधितांना सूचित करावे.

10) वसतिगृहातील इमारतीवरील व भूमिगत टाक्या सलग दोन दिवस साफ-सफाईसाठी घेण्यात येऊ नये. एका दिवशी एकतर किमान तीन दिवसांनी दुसरी टाकी देखभालीसाठी घेण्यात यावी.

11) निविदा भरण्यापूर्वी कंत्राटदाराने साईट व्हिसिट (भेट) करण्यास हरकत नाही जेणेकरून कामाचे स्वरूप व इतर कामासंबंध्दती गरज लक्षात येतेल.साईट व्हिसिटसाठी कार्यालयात प्रबंधक यांच्याशी संपर्क साधावा.

12) टाकी सफाईचे काम झाल्यानंतर त्यावर मागील सफाईचा दिनांक व सध्या सफाई केलेला दिनांक लिहिणे (पेंट किंवा मार्कर) गरजेचे आहे.

13) कंत्राट दराने टाकी साफसफाईच्या प्रक्रियेसाठी नमुना चेकलिस्ट तयार करून जमा करणे आवश्यक आहे. काम सुरू करण्यापूर्वी महाविद्यालयातील प्रभारी कर्मचाऱ्यास अवगत करावे.

14) कामादरम्यान काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा काही अपघात झाल्यास याची सर्व जबाबदारी ही कंत्राटदाराची असेल त्याकरता योग्य त्या सुरक्षेच्या वस्तू व संसाधने पुरवण्याचे काम कंत्राटदाराचे असेल.

15) काम करतांना संस्थेतील इमारतीस किंवा टाकीस काही नुकसान झाल्यास दुरुस्तीची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

16) सफाईचे काम पूर्ण झाले की त्याचा अहवाल कार्यालयास तात्काळ कळवावा.

17) सदरचे कंत्राट हे ११ महिन्यांकरिता लागू राहील.

18) तसेच कोणत्याही क्षणी/वेळेस, कुठलेही कामासाठी कामावर बालमजूर ठेवता येणार नाहीत किंवा बालमजूर संस्थेच्या परिसरात पाठविता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

19)निवड झालेल्या सेवा पुरवठादार तर्फे काम करणाऱ्या मनुष्यबळास ओळख पत्र व ड्रेस कोडमध्ये संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. सदर ओळखपत्र व ड्रेस कोड सेवा पुरवठादारांनी द्यायचा आहे.

20) सेवा पुरवठादारास राज्य व केंद्र शासनाच्या कामगार कायद्याचे पालन करणे बंधनकारक असेल. कायद्याचे पालन करण्यास कुचराई होत असल्याचे लक्षात आल्यास सेवा पुरवठा दाराचे कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल व होणाऱ्या कायदेशीर कारवाईस सेवापुरवठादार जबाबदार राहील

## दुसरा भाग- आर्थिक/वित्तीय निविदा (Financial/commercial Bid )

"अ. क्र. २ **आर्थिक/वित्तीय निविदा**" मध्ये निविदाकाराने खालील कागदपत्रे अनुक्रमे जोडावीत

**आर्थिक/वित्तीय** निवीदा सोबत जोडलेल्या ''प्रपत्र २'' नुसार निविदा धारकांनी संस्थेच्या लेटरहेडवर भरून सही व शिक्का निशी सीलबंद करण्यात यावा तसेच लिफाफ्यावर "अ. क्र. २ **आर्थिक/वित्तीय निविदा**" असे सुस्पष्ट शब्दात लिहावे.

प्रथमता प्रपत्र क्रमांक एक उघडण्यात येईल व सदर कागदपत्राची पूर्तता करणाऱ्या निविदाधारकासच पुढील प्रक्रिया साठी पात्र ठरविण्यात येईल. तांत्रिक निविदा पात्र झालेल्या निविदा धारकाचे आर्थिक तथा वित्तीय निविदा उघडण्यात येतील. तांत्रिक निविदा अपात्र निविदा धारकाचे "अ. क्र. २ **आर्थिक/वित्तीय निविदा**" उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी

अ) निविदाधारकांनी प्रपत्र 2 मध्ये नमूद केलेल्या वेगवेगळ्या बाबीचे नमूद करावेत.

ब) प्रपत्र 2 मधील एकूण रकमेनुसार निविदाधारक अंतिम करण्यात येईल.

क) सर्वसामान्य नियम व अटी मधील अनु क्रमांक सहा(6) मध्ये नमूद केलेल्या (a) ते (g) नुसार काम होणार की नाही याबद्दल माहिती हो किंवा नाही मध्ये द्यावी

ड) आर्थिक वित्तीय निविदा नुसार ठरलेल्या दरात कुठलाही बदल करता येणार आहे.

प्रपत्र-१

तांत्रिक निविदा विवरणपत्र

(निविदा धारकांनी संस्थेच्या लेटरहेडवर किंवा शिक्का असलेल्या कोऱ्या कागदावर घ्यावे)

**१. निविदा धारक /सेवा कंत्राटदाराच्या संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता:**

**२. निविदा आधारित संस्थेचा नोंदणी क्रमांक व नोंदणीकृत पत्ता:**
**( नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी)**

**३. कंत्राटदाराचे नाव व पत्ता :-**

**दूरध्वनी क्रमांक (अधिकृत) व ई-मेल:-**
**४. अनुभवाचा तपशील( आवश्यक प्रमाणपत्रे जोडावीत): ______________ वर्ष व महिने**

**५. निविदा धारक/संचालकाचे ओळखपत्राचा तपशील:**

**६. तांत्रिक बोलीतील अट क्रमांक अ ते प प्रमाणे( आवश्यक प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती):**
**एकूण__________ पाने/ पेजेस**

**(खालील प्रमाणे लागू असल्यास माहिती द्यावी)**
**७. भागीदारांचे नाव आणि पत्ता ( लागू असल्यास, भागीदारी करार):-**

**८. पॉवर ऑफ अटर्नी असलेल्या व्यक्तीचे नाव आणि पत्ता( लागू असल्यास):**

**मी /आम्ही खालील सही करणार/ करणारे असे शपथपूर्वक प्रमाणित करतो कि वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी असून खोटी आढळल्यास होणाऱ्या परिणामाची जबाबदारी माझी/ आमची राहील तसेच सदर कंत्राटासाठी आपण नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती ( सर्व सामान्य अटी व शर्ती सह) मला/आम्हाला मान्य आहेत.**

**ठिकाण:**
**दिनांक:** **(सही नाव व शिक्का)**

प्रपत्र-२

आर्थिक/वित्तीय निविदा विवरणपत्र

**सेवा पुरवठादार या संस्थेचे नाव:**

**कामाचे नाव:- GCOE कंपस जळगाव येथे ओव्हरहेड आणि भूमिगत पिण्याच्या पाण्याच्या साठवण टाकीची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण**

| अनु.क्र. | वर्णन | प्रमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | U/G व O/H पाण्याच्या टाकीची स्वच्छता या निर्जंतुकीकरण हे रासायनिक व प्रतिजैविक घटक वापरून कारणेबाबाबत:-<br><br>सबमर्सिबल पंपाच्या साहाय्याने टाक्यांमधील पाणी व तसेच तळाशी जमा झालेली घाण पाणी, गाळ इत्यादी काढणे. तसेच टाकीच्या भिंती या आतील छत हे विशेष जेट मशीन व रोटरी पंपच्या साहाय्याने १००-११२० बार दाबाने आतील घाण,शेवाळ तत्सम घाण व स्क्रबिंग मशीन वापरून डाग काढणे. तसेच आतील ताल या फारशी स्वच्छ करण्यास युरेका फोर्बस किंवा त्याचा दर्जाचे रसायने वापरून व जेट क्लिनर वापरून जमलेली सर्व घाण, गाळ हे स्लजे पंपाच्या साहाय्याने काढणे,तशेच औद्योगिक व्हॅक्युम क्लिनरचा वापरून सर्व ताल घाणमुक्त करणे.<br><br>प्रतिजैविक व रसायने यांच्या फवारणी करून टाकीतील मायक्रो ऑरगॅनिझम नाहीसे करणे व तसेच ४ फूट लांबीचा अतिनील रेडिएटर वापरून उर्वरित तरंगणारे बॅक्टेरिया व विषाणू नाहीसे करणे.<br><br>वरील सर्व प्रक्रिया या प्रशिक्षित तंत्रध्यानच्या साहाय्याने विशेष बूट व ड्रेस मध्ये संबंधित व्यक्तीने अभियंत्याच्या निर्देशानुसार पार पाडाव्यात. | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण अनुक्रमांक (१) ची किंमत | | | | |
| २ | शा. अ.महाविद्यालय जळगाव येथील परिसरातील निवासस्थाना सह पाण्याच्या टाक्याचे क्षमतेचे विवरण पत्र अ आणि ब मध्ये समाविष्ठ आहे (विवरण पत्र अ व ब पाहावे ) | | | | |
| | विवरण पत्र 'अ' नुसार किंमत | | | | |
| | विवरण पत्र 'ब' नुसार किंमत | | | | |

अनुक्रमांक (१) व (२) सह.

एकूण रु.:

अक्षरी रु:

निविदा काराची नाव व सही (शिक्का )

खालील बाबी कामात समाविष्ठ आहेत किंवा नाही  होय किंवा नाही (उत्तर द्यावे )

| | |
|---|---|
| a. Dewatering : | होय/ नाही |
| b. Sludge Removing Treatment | होय/ नाही |
| c. Algaecide Treatment: | होय/ नाही |
| d. High Pressure Treatment: | होय/ नाही |
| e. Improver Treatment: | होय/ नाही |
| f. Chlorination Treatment (High Dose): | होय/ नाही |
| g. Pipelines Treatment | होय/ नाही |

अधिकच्या सुविधा किंवा काही टिप्पणी असल्यास संशिप्तपणे देणे:

निविदाकाराची  नाव सही व शिक्का

विवरण पत्र:-अ

| अनु.क्र. | वस्तूंचे नाव आणि तपशील | लिटर | संख्या | दर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1) | भूगर्भातील पाणी साठवण टाक्यांची स्वच्छता<br>अ) वर्ग I निवासस्थान<br>b) वर्ग III निवासस्थान | 20000 U/G<br>2000 O/H<br>30000 U/G<br>2000 O/H<br>3000 O/H | 1<br>4<br>1<br>7<br>1 | | |
| 2) | अतिथी गृह | 1000 O/H | 1 | | |
| 3) | स्थापत्य विभाग | 25000 O/H | 2 | | |
| 4) | कार्यशाळा | 1000 O/H | 1 | | |
| 5) | ग्रंथालय | 2000 O/H | 2 | | |
| 6) | प्राचार्य निवासस्थान | 2000 O/H<br>1000 O/H | 1<br>2 | | |
| 7) | मुख्य पंपहाऊस U/G | 150000 | 1 | | |
| 8) | मुख्य इमारत O/H | 1000<br>2000<br>3000<br>5000 | 2<br>1<br>10<br>2 | | |
| | एकूण (विवरण पत्र 'अ ' साठी ) | | | | |

## विवरण पत्र:-ब

मुलांचे वसतिगृह क्र.१

| | संख्या | प्रत्येक टाकीची क्षमता | दर |
|---|---|---|---|
| अंडरग्राऊंड सिमेंट टाकी- | 01 | 40,000 लिटर | |
| टाकी | 08 | 3000 लिटर | |
| टाकी | 02 | 1000 लिटर | |
| टाकी | 02 | 2000 लिटर, खानावळ | |
| टाकी | 01 | 500 लिटर,खानावळ | |

मुलांचे वसतिगृह क्र.2

| | संख्या | प्रत्येक टाकीची क्षमता | दर |
|---|---|---|---|
| अंडरग्राऊंड सिमेंट टाकी- | 01 | 40,000 लिटर | |
| टाकी | 08+01=09 | 3000 लिटर | |
| टाकी | 02 | 2000 लिटर, खानावळ | |
| टाकी | 01 | 500 लिटर, आर . ओ . वॉटर | |
| टाकी | 01 | 500 लिटर,खानावळ | |

मुलींचे वसतिगृह

| | संख्या | प्रत्येक टाकीची क्षमता | दर |
|---|---|---|---|
| टाकी | 09 | 2000 लिटर | |
| टाकी | 04 | 1000 लिटर | |
| टाकी | 03 | 500 लिटर,आर.ओ.वॉटर | |

अल्पसंख्याक वसतिगृह

| | | | |
|---|---|---|---|
| टाकी | 03 | 5000 लिटर | |
| टाकी | 02 | 3000 लिटर | |
| | | एकूण किंमत (विवरण पत्र ‘ब ‘ साठी ) | |

वरील प्रमाणे मुलांच्या आणि मुलींच्या  वसतिगृहातील आणि मेस  वरील व अंडरग्राऊंग टाक्या असून त्या झाकण्या सह स्वच्छ करणे आवश्यक आहे
नोट: विवरण पात्र 'अ ' व 'ब' ची ऐकून किंमत विवरण पत्र २ मध्ये नमुद करावे

**निविदाकाराची   नाव सही व शिक्का**

## प्रपत्र-३

## कंत्राटदाराने पूर्ण केलेली कामे

**कंत्राटदाराने पूर्ण केलेली कामे:**

**मागील १ वर्षात समाधानकारकपणे पूर्ण झालेली कामे/यादी.**

| कामांची नावे | कामाचे स्थान | कामाचे मूल्य | नाव किंवा संस्था, कार्यकारी अभियंता ज्याच्या अंतर्गत केले जाते |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**N.B- फर्मकडून कामाच्या ऑर्डरची प्रत आणि पूर्तता प्रमाणपत्रे संलग्न केली जाऊ शकतात**

निविदाकाराची स्वाक्षरी (तारखेसह)

सर्व सेवा पुरवठादाराने/कंत्राटदारांनी लक्षात ठेवावे कि अंतिम दिनांक ४ एप्रिल २०२२ असून निविदा महाविद्यालयाच्या कार्यालयात दिनांक ४ एप्रिल २०२२ (सायं. 5 वाजेपर्यंत) स्वीकारल्या जातील. पोस्टाद्वारे अथवा इतर कारणाने उशिरा मिळालेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| अनु क्रमांक | संक्षिप्त माहिती/ विवरण | दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्ध करणे( सूचना फलक, संस्थेचे संकेतस्थळ) | २३/०३/२०२२ |
| २ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | ०४/०४/२०२२ (सायं ५ वा.) |
| ३ | निविदा उघडण्याचा( मुख्य लिफाफा/तांत्रिक लिफाफा) दिनांक व वेळ | ०५/०४/२०२२ (सायं ४ वा. ) |
| ४ | अपात्र निविदा धारकांची नावे प्रकाशित करणे | ०५/०४/२०२२ (सायं ५ वा.) |
| ५ | अपात्र निविदाधारकांची पात्रताविषयी अपील व अर्ज | ०६/०४/२०२२ (दु. २ वा. पर्यंत ) |
| ६ | अपील निकाली काढणे | ०६/०४/२०२२ (दु. १२. ३० वा.) |
| ७ | आर्थिक/वित्तीय निविदा उघडणे | ०७/०४/२०२२ (स. ११. ३० वा.) |

**निविदेसोबत योग्य ती कागदपत्रे व सहपत्रे न जोडल्यास निविदा रद्द करण्यात येईल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव यांनी राखून ठेवला आहे**

**दिनांक: २३/०२/२०२२**

**सही/-**
**प्राचार्य**
**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव**

Scanned By Scanner Go